नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १८८ Issue - 188 | वार शुक्रवार दि. २८ नोव्हेंबर २०२५ Blow- Friday Date 28 November 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## नगरपालिका निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाची यंत्रणा सज्ज

### १ कोटी ७ लाख ३ हजार ५७६ मतदार मतदानाचा हक्क बजावणार ; निवडणूक आयोगाने दिली माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या मतदानासाठी निवडणूक आयोगाची यंत्रणा सज्ज झाली आहे. नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी एकूण १ कोटी ७ लाख ३ हजार ५७६ मतदार मतदानाचा हक्क बजा-वणार आहेत. त्यासाठी सुमारे १३ हजार ३५५ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती निवडणूक आयोगाने दिली. या निवडणुकांसाठी ईव्हीएम मशीनचा व्यवस्था करण्यात आली असून त्यात १३ हजार ७२६ कंट्रोल युनिट आणि २७ हजार ४५२ बॅलेट युनिटची उपलब्धता करण्यात आली आहे.

राज्यातील २४६ नगरपरिषदा तर ४२ नगरपंचायतींच्या (एकूण २८८) सदस्यपदासाठी आणि थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. २ डिसेंबरला सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत मतदानाची वेळ असणार आहे. तर मतमोजणी ३ डिसेंबरला सकाळी १० वाजेपासून सुरु होणार आहे.

दुबार नावांसमोर डबल स्टार चिन्ह

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार यादीतील संभाव्य दुबार म तदाराच्या नावासमोर (**) असे डबल स्टार चिन्ह नमूद करण्यात येणार आहे. त्यामुळे ज्याच्या ना-वासमोर ते चिन्ह आहे त्याने कुठे मतदान करणार आहोत याची माहिती देणं आवश्यक आहे. अशा मतद-ाराने एका ठिकाणी मतदानाचा हक्क बजावला तर दुसऱ्या ठिकाणी तशी



माहिती देण्यात येणार आहे. त्यामुळे दोन ठिकाणी त्याला मतदान करता येणार नाही याची खबरदारी निवडणूक आयोगाने यावेळी घेतल्याचं दिसून येतंय.

नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या या निवडणुकांसाठी २८८ निवडणूक निर्णय अधिकारी आणि २८८ सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर ६६ हजार ७७५ इतके अधिकारी आणि कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

एकूण मतदार व मतदान केंद्र

पुरुष मतदार- ५३,७९,९३१, महिला मतदार- ५३,२२,८७०, इतर मतदार- ७७५, एकूण मतदार- १,०७,०३,५७६, एकूण मतदान केंद्र- सुमारे १३,३५५

नगरपरिषद/ नगरपंचायतींची जिल्हा व विभागनिहाय संख्या

पालघर- ४ रायगड- १० रत्नागिरी- ७ सिंधुदुर्ग- ४ ठाणे- २

कोकण विभाग एकूण- २७

अहिल्यानगर- १२ धुळे- ४ जळगाव- १८ नंदूरबार- ४ नाशिक- ११

नाशिक विभाग एकूण- ४९

कोल्हापूर- १३ पुणे- १७ सांगली- ८ सातारा- १० सोलापूर- १२

पुणे विभाग एकूण- ६०

छत्रपती संभाजीनगर- ७ बीड- ६ धाराशिव- ८ हिंगोली- ३ जा-लना- ३ लातूर- ५ नांदेड- १३ परभणी- ७

छत्रपती संभाजीनगर एकूण- ५२

अमरावती- १२ अकोला- ६ बुलढाणा- ११ वाशीम- ५ यवतमाळ- ११ अमरावती विभाग एकूण- ४५ भंडारा- ४ चंद्रपूर- ११ गडचिरोली- ३ गोंदिया- ४ नागपूर- २७ वर्धा- ६ नागपूर विभाग एकूण- ५५

## मस्ती असलेल्या लोकांना खड्यासारखं बाजूला काढलं जातं, प्रत्येकाचा फुगा फुटत असतो

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



### अजित पवारांचा राजन पाटलांवर हल्लाबोल

सोलापूर : प्रत्येकाचा एक काळ असतो. दरवेळी दमदाटी करुन चालत नाही. प्रत्येकाचा फुगा हा फुटत असतो. मस्ती असलेल्या लोकांना खड्यासारखं बाजूला काढले जाते, अशा शब्दांत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नुकत्याच भाजपम ध्ये गेलेल्या राजन पाटील यांना लक्ष्य केले. मोहोळ तालुक्यातील अनगर नगरपंचायत गेल्या काही दिवसांपासून चर्चेचा विषय ठरली होती. याठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस सोडून भाजपमध्ये गेलेल्या राजन पाटील यांनी अनेक वर्षांपासून सत्ता आहे. राजन पाटील यांनी अनगर नगरपंचायतीमधील १७ जागा बिनविरोध निवडून आणल्या होत्या. मात्र, नगराध्यक्षपदी राजन पाटलांची सून रिंगणात असताना अजित पवार गटाकडून उज्वला थिटे (णक्षक्षुरश्रर ढहळींश) यांना रिंगणात उतरवले होते. उज्वला थिटे यांना उम ेदवारी अर्जच भरता येऊ नये, म्हणून अनगरमध्ये दहशतीचे राजकारण झाल्याची चर्चा होती. शेवटी निवडणूक अधिकाऱ्यांनी नाट्यमयरित्या उज्वला थिटे यांचा उमेदवारी अर्ज तांत्रिक कारणामुळे बाद ठरला होता. याविरोधात उज्वला थिटे कोर्टात गेल्या होत्या, परंतु, न्यायालयाने त्यांची याचिका फेटाळून लावली होती. यानंतर उज्वला थिटे यांनी आपण राजन पाटील यांच्याविरोधात लढा सुरुच ठेवणार असल्याचे सांगितले होते. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा अजित पवार हे गुरुवारी सोलापूरमधील वडाळा येथील कार्यक्रमाला हजेरी लावल्या होती. या कार्यक्रमात अजित पवारांच्या हस्ते उज्वला थिटे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी अजित पवार यांनी राजन पाटील यांच्यावर टीकास्त्र सोडले. उज्वला थिटे इथे बसल्या आहेत, त्यांच्याबाबतीत काय झालं आपण बघितलं. आपल्याकडे लोकशाही आहे. संविधान, कायदा हा सर्वांना सारखा आहे. सर्वांना निवडणुकीत उभं राहायचं अधिकार आहे. दमदाटी करून चालत नाही. प्रत्येकाचा फुगा फुटत असतो. मस्ती असलेल्या लोकांना खड्यासारखं बाजूला काढले जाते, अशी खरमरीत टीका अजित पवार यांनी केली. हे जे दमदाटी तुम्ही सर्वांनी म्हटलं, पण ज्या गावचं बोरी त्याचं गावचं बाभळी असतात. कोणी अरे केलं तर कारे करणारे असतात. आमच्या लाडक्या बहिणी इथं आहे. उज्वला थिटेही इथे आहे. भाऊ म्हणून आम्ही कायम आमच्या बहिणीचं संरक्षण करण्याच काम केले. पुढच्या निवडणुकीत चांगल्या विचारांच्या लोकांना पुढे येऊ द्या. नव्याना संधी द्या आणि जुन्याचा अनुभवदेखील घ्या, असे अजित पवार यांनी स्थानिक नेत्यांना सांगितले.

उज्वला ताई, आम्ही कायम महिलांचा सन्मान करणारे आहोत. महिलांना संधी दिल्यास ते सोनं करतात. महाराष्ट्र हे पहिलं राज्य आहे जिथं महिलांना पन्नास टक्के आरक्षण दिलं. पवार साहेबांनी सुरवात केली, त्यात आम्ही भर घातली. म्हणूनच आम्ही लाडकी बहिणी योजना सुरु केली, ज्याची चर्चा झाली. महिला थोड्या प्रमाणात का असेना स्वयंपूर्ण झाल्या. ४५ हजार कोटी रुपये चांद्यापासून बांदापर्यंत देतोय, असेही अजित पवार यांनी म्हटले.

## संतोष बांगर यांच्या घरावर १०० पोलिसांची धाड, गुंडाच्या घरासारखी झाडाझडती घेतली; हेमंत पाटलांचा भाजप आमदारावर आरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हिंगोली : राज्यात मित्रपक्ष असलेल्या भाजप आणि शिवसेनेतील हिंगोलीतील वाद आता चव्हाट्यावर आला आहे. कळमनुरीचे शिवसेना आमदार संतोष बांगर यांच्या घरी १०० पोलिसांनी पहाटे धाड टाकून झाडाझडती घेतल्याची माहिती विधानपरिषदेचे आमदार हेमंत पाटील यांनी दिली. भाजप आमदाराच्या दबावाखाली पोलिसांनी ही कारवाई केली असल्याचा आरोप हेमंत पाटील यांनी केला. या प्रकरणाची दखल एकनाथ शिंदे यांनी घेतली असून आपण मुख्यमंत्र्यांनाही भेटणार असल्याचं ते म्हणाले.

हिंगोली नगरपालिका निवडणुकीत शिंदेंचे आमदार संतोष बांगर आणि भाजपचे आमदार तानाजी मुटकुळे आमनेसामने आले आहेत. भाजप आम दाराच्या दबावामुळेच संतोष बांगर यांच्या घराची झाडाझडती घेण्यात आल्याचा आरोप हेमंत पाटील यांनी केला.



शिवसेनेचे विधानपरिषदेचे आमदार हेमंत पाटील म्हणाले की, जिल्ह्यात शिवसेनेची स्थिती आता चांगली आहे. कळम नुरी आणि हिंगोली शहरावर सेनेचा भगवा फडकणार आहे. परंतु विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकल्याचं दिसतंय. संतोष बांगर यांच्या घरावर पहाटे पाच वाजता १०० पोलिसांनी धाड टाकून झाडाझडती घेतली. संतोष बांगर यांची ७५ वर्षांची आई आजारी असताना त्यांच्या घराची झाडाझडती घेऊन त्रास देणे ही अतिशय वाईट गोष्ट आहे.

हेमंत पाटील पुढे म्हणाले की, आमदार असल्याने त्यांच्या घराची झाडाझडती करताना त्याची पूर्व पर-वानगी घ्यावी लागते. पण विधानसभा सभापतींकडून तसा कोणताही आदेश वा मेल आला नाही. मग ही धाड कुणाच्या सांगण्यावरुन टाकण्यात आली? सत्त-ाधारी आमदार मुटकुळेंच्या दबावाखाली ही कारवाई करण्यात आली आहे का?

या प्रकरणाची गंभीर दखल एकनाथ शिंदे यांनी घेतली आहे. तसेच आम्ही दोन्ही जिल्ह्यातील आमदार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट घेणार आहोत. राज्यात आम्ही सत्तेतील समान वाटेकरी आहोत. असं असतानाही स्थानिक आम दार पोलिसांवर दबाब टाकत आहेत, ते आम्ही मुख्यमंत्र्यांच्या कानावर घालणार आहोत असं हेमंत पाटील म्हणाले.

एखाद्या आमदाराच्या घराची झाडाझडती ही दहशतवादी किंवा गुंडाच्या घराची झाडाझडती केल्यासारखी घेण्यात आली. निवडणुका या काही काळापुरत्या आहेत, लोक आपल्याकडे बघत असतात असं सांगत हेमंत पाटील यांनी महायुतीतील मित्रपक्षावर टीका केली.

संतोष बांगर हा हिंगोली जिल्ह्याला लागलेला कलंक असल्याचं म्हणत भाजपचे आमदार तानाजी मुटकुळे यांनी टीका केली. संतोष बांगर पैशांशिवाय राहू शकत नाही. त्यांचे अनेक अवैध धंदे असल्याचा आरोप तानाजी मुटकुळे यांनी केला. संतोष बांगर यांनी सत्तांतराच्या काळात ५० खोके घेतले ही सत्य गोष्ट असल्याचा दावा भाजप आमदार तानाजी मुटकुळेंनी केला आहे.

## सिडकोच्या ४,५०० कोटींच्या घोटाळ्याची चौकशी होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

### विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत

नवी मुंबई : यशवंत बिवलकर यांच्याशी संबंधित ४५०० कोटी रुपयांच्या कथित सिडको जमीन घोटाळा प्रकरणाची चौकशी करण्यात येणार आहे. या प्रकरणी राज्य सरकारकडून कोकण विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार (ठेहळीं झरुरी) यांनी सिडकोचे तत्कालीन प्रमुख संजय शिरसाट यांच्यावर घोटाळा केल्याचा आरोप केला होता.

राज्य सरकारकडून यशवंत बिवलकर यांच्या सर्व जमिनींची चौकशी करण्यासाठी ही समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीत मुख्य वन संरक्षक ठाणे, जिल्हाधिकारी रायगड, सिडको सहव्यवस्थापकीय संचालक, मुख्य भूमी आणि भूमापन अधिकारी ठाणे आणि रायगड यांचा सम ावेश आहे.

आमदार रोहित पवार यांनी सातत्याने बिवलकर यांनी ४ हजार ५०० कोटी रुपयांचा सिडकोच्या जमिनीचा घोटाळा केला होता. या असून मंत्री संजय सिरसाठ यांचा यात समावेश असल्याचा आरोप केला होता. संजय शिरसाटांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करत यंशवंत बिवलकर यांना ४,५०० कोटी रुपयांची जमीन दिल्याचा आरोप रोहित पवारांनी केला होता.

संबंधित प्रकरणी वन विभागाकडून पोलिसांना गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र दीड महिना उलटला तरी पोलिसांकडून कोणतीही हालचाल करण्यात आली (पान २ वर...)

## मुंबईतील वाढत्या प्रदूषणावरुन न्यायालयाचा संताप, काय उपाययोजना करणार याची माहिती द्या, न्यायालयाचा आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : शहरातील वाढत्या वायू प्रदूषणावरून मुंबई उच्च न्यायालयाकडून संताप व्यक्त करण्यात आला आहे. हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठीच्या प्रभावी उपायांची तसेच पालिकेने आणि राज्य सरकारने केल्या उपाययोजनांची उच्च न्यायालयाने माहिती मागितली आहे. आता या प्रकरणी शुक्रवारी तातडीने सुना-वणी घेण्यात येणार आहे.



मुंबई आणि आसपासच्या परिसराची खालावलेली हवेची गुणवत्ता ही इथिओपिया ज्वालामुखी उद्रेकामुळे झाल्याचा दावा सरकारी वकिलांनी केला. पण हा दाव न्यायालयाने खोडून काढला. ज्वालामुखीचं करण देऊ नका, मागील काही दिवसाप-ासून मुंबईच्या एक्यूआय वाढल्याचं आणि मुंबईची दृश्यमानता खालावली असल्याचं उच्च न्यायालयाने स्पष्ट केलं.

मुंबई महापालिका, राज्य सरकारसह महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाला भूमि का स्पष्ट करण्याचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने आदेश दिले आहेत.

मुंबईचा हवा गुणवत्ता निर्देशांक घसरला आहे. किनारपट्टी लगतच्या भागातील हवा गुणवत्ता वाईट श्रेणीत गेली आहे. मागील काही दिवसांपासून मुंबईतील हवा गुणवत्ता पातळी खालवल्याचे चित्र आहे. याप्रकरणी, सर्व पक्षीय नेत्यांनी आवाज उचलला आहे.

आदित्य ठाकरेंकडून भाजप सरकार फक्त बिल्डर्स आणि कंत्राटदारांना महत्त्व देत असल्याचे म्हणत संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे नियम शिथील करत बिल्डर्ससाठी जागा खुले करण्याची योजना असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला. तर दुसरीकडे शिंदेंच्या शिवसेनेचे खासदार मिलिंद देवरा यांनी मुंबईतील सुरु असलेली बांधकामे जोपर्यंत हवा गुणवत्ता सुधारत नाही तोपर्यंत बंद करावी अशी मागणी पालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे केली.

दरम्यान, याप्रकरणी मुंबई म हापालिकेकडून पुन्हा एकदा डीपक्लिनिंगचे आयोजन करण्यात येणार असून रस्ते पाण्याने साफ करण्याचे नियोजन करण्यात आले आहेत.



## संपादकीय....

### ट्रम्प 'जमिनी'वर

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या 'अमेरिका फर्स्ट' धोरणामुळे अमेरिकेच्या सर्वात आधुनिक लढाऊ विमान एफ-३५ च्या डीलला मोठा फटका बसला आहे. अमेरिका फर्स्ट या धोरणांतर्गत विदेशी वस्तूंवर लावण्यात आलेल्या प्रचंड शुल्कांमुळे भारतासह ६ देशांनी एफ-३५ खरेदीचे करार रद्द केले किंवा थांबवले आहेत. यामुळे लॉकहीड मार्टिन कंपनीला अब्जावधी डॉलर्सचे नुकसान होत असून अमेरिकेतील नोकऱ्यांवरही संकट आले आहे. एफ-३५ लाइटनिंग खख हे लॉकहीड मार्टिन कंपनीने बनवलेले जगातील सर्वात प्रगत स्टील्थ लढाऊ विमान आहे. अमेरिकेसह २० हून अधिक देश याचा वापर करतात. हे विमान शत्रूच्या रडारला गुंगारा देऊ शकते आणि हवा, जमीन व समुद्रात हल्ला करण्यास सक्षम आहे. मात्र, प्रत्येक विमानाची किंमत ८० ते १०० मिलियन डॉलर्स म्हणजेच भारतीय रुपयांत ७१५ कोटी रुपये ते ८९३ कोटी रुपये आहे. जर या विमानांची मोठ्या प्रमाणात खरेदी झाल्यास किंमतीमध्ये सवलत मिळते. ट्रम्प यांनी मध्ये विदेशी वस्तूंवर १०% ते ५०% पर्यंत शुल्क लावले. हे टॅरिफ प्रत्युत्तरादाखल लावण्यात आले आहे. ज्यानुसार जे देश अमेरिकन वस्तूंवर कर लावतात, त्यांच्यावरही तसाच कर लावला जातो. एप्रिल २०२५ पर्यंत सरासरी शुल्क २७% झाले, जे १०० वर्षांतील सर्वाधिक टॅरिफ आहे. ट्रम्प यांच्या मते, यामुळे अमेरिकेतील नोकऱ्या वाचतील. परंतु, एफ-३५ चे सुटे भाग जगभरातून येतात. या शुल्कांमुळे विमानाची किंमत वाढली, ज्यामुळे अनेक मित्र राष्ट्रे नाराज झाली आहेत. त्यामुळे, ही राष्ट्रे आता युरोपियन विमानांना, जसे की राफेल, युरोफायटर किंवा ग्रिपेन यांना प्राधान्य देत आहेत. यामुळे एफ-३५ च्या निर्यातीवर मोठे संकट आले आहे. भारताने एफ-३५ ला पूर्णपणे नाकारले आहे. एयरो इंडिया २०२५ मध्ये अमेरिकेने हे विमान प्रदर्शित केले होते, परंतु ५०% शुल्कामुळे त्याची किंमत खूप वाढली. भारत आता स्वदेशी तंत्रज्ञान आणि उत्पादनावर अधिक लक्ष केंद्रित करत आहे. स्पेनने ४५-५० जेट्सचा करार रद्द केला आहे. ट्रम्प यांनी स्पेनला नाटोच्या ५% संरक्षण खर्चाच्या नियमाचे पालन न केल्याबद्दल फटकारले होते आणि शुल्काची धमकी दिली होती. पोर्तुगालने मार्च २०२५ मध्ये तब्बल ३६, एफ-३५ जेट खरेदी करण्याची योजना रद्द केली आणि जुन्या ऋ-१६ च्या जागी राफेल किंवा ग्रिपेन यांसारखे युरोपियन पर्याय निवडले. स्वित्झर्लंडचा ३६ जेट्सचा ९.१अब्ज डॉलर्सचा करार धोक्यात आहे. ट्रम्प यांनी स्विस वस्तूंवर ३९ % कर लावला होता, जो नंतर १५% झाला. तरीही, स्विस खासदार नाराज आहेत आणि ४२ हजार लोकांनी सौदा रद्द करण्याची याचिका दाखल केली आहे. कॅनडाने ७२ जेट्सचा करार पुनरावलोकनाखाली ठेवला आहे. त्यांना १६ जेट्स मिळाले आहेत, परंतु वाढत्या खर्चामुळे आणि अमेरिकेवरील विश्वासाच्या कमतरतेमुळे ते अडचणीत आहेत. स्वीडनचा ७२ जेट्सच्या कराराचे भवितव्य अनिश्चित आहे. या सर्व रद्द झालेल्या करारामुळे एफ-३५ कार्यक्रमाला १०० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त नुकसान होत आहे. पेंटागॉनने २०२६ साठी खरेदी कमी केली आहे. याचा अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेवरही भार पडत आहे, ज्यामुळे प्रत्येक घरामागे १,२०० डॉलर्सचा अतिरिक्त कर लागू शकतो. लॉकहीड मार्टिनला नोकऱ्या कमी होण्याची भीती आहे. थोडक्यात, 'अमेरिका फर्स्ट' धोरण अमेरिकेच्याच हिताला धक्का देत आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांचे स्पष्टीकरण, पुढील महिन्यात उच्चस्तरीय बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : नियोजित आयटी पार्कच्या ५० एकर जमिनीवर १९० फूट उंचीच्या (१५ मजली)इमारती बांधू शकतो. विमानतळावरून उडणाऱ्या विमानांना त्याचा धोका नाही. विमान-सेवा प्राधिकरणाने त्याला काहीही हरकत नसल्याचे स्पष्ट केले आहे. शिवाय या पार्कवरील आयटी उद्योगांना स्वस्त दरात वीजपुरवठा करण्यासाठी एनटीपीसीचे अधिकारी येत्या शुक्रवारी (ता. २८) भेटीसाठी येत आहेत. त्यांच्याशी चर्चा झाल्यानंतर वीजदराचा करार होऊ शकतो, असे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोमवारी पत्रकारांना सांगितले. नियोजित आयटी पार्कसाठी होटगी रस्त्यावरील जलसंपदा विभागाच्या अखत्यारीतील ५० एकर जमीन निश्चित केली. विमानतळापासून




पाच किलोमीटर लांब असलेल्या या जमिनीवर बहुमजली इमारती बांधण्यात येतील. त्याला कोणत्याही तांत्रिक अडचणी येणार नाहीत, असेही त्यांनी स्पष्ट केले. त्याचा सविस्तर प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवण्यात आलेला आहे. पुढील महिन्यात होणाऱ्या उच्चस्तरीय समितीच्या बैठकीतनंतर ही जागा एमआयडीसीकडे वर्ग करण्याची प्रक्रिया होईल. त्यानंतर एमआयडीसीकडून पायाभूत सुविधा देण्याचे काम होणार आहे. १९० फूट उंच म्हणजे १५ मजली व्यावसायिक इमारती असतील. १९० फूट उंच म्हणजे १२ ते १५ मजली इमारती बांधता येतील. त्या व्यावसायिक असल्याने त्यांची उंची अधिक असते. मोठी दालने असतात. पार्किंगची सुविधा असते. त्याला कॉर्पोरेट लूक देण्यासाठी पुरेशी जागा सोडण्यात येते. तिथे पर्यावरणपूरक गोष्टींचा समावेश असतो. आयटीसाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा आणि त्याचे बाह्यरूप हे पूर्णत: वेगळे असते. इमारती काचेच्या असतात. त्यामुळे बाहेरून त्याचे मजले दिसणार नाहीत. परंतु आता लक्झरियस दालने, व्हीआयपी रूम्स, कँटीन, रेस्टॉरंट, विरंगुळा केंद्र अशा सर्व बाबींचा समावेश इमारतीत असतो. जेणेकरून तिथल्या कर्मचाऱ्यांना कोणत्याही गोष्टीसाठी बाहेर जायची आवश्यकता नसते.

**विमानतळ परिसरात मांस दुकाने पाहणार**

विमानतळ परिसरात खुल्या पद्धतीने मांस विक्री होत असल्याने पक्षी आणि भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला. त्याचा थेट परिणाम विमानसेवेवर होऊ शकतो. त्याची पूर्वदक्षता म्हणून परिसरात मांस विक्रीच्या दुकानांची पाहणी करण्याचे आदेश दिले आहेत. १५ दिवसांत संबंधितांवर कारवाईच्या सूचनाही केलेल्या आहेत. शिवाय संपूर्ण परिसरात सुरक्षेचा उपाय म्हणून सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करण्याचे कामही सुरू झाल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली.

**उड्डाणपुलाचा प्रस्ताव केंद्राकडे पाठवला**

छत्रपती संभाजी महाराज पुतळा ते पत्रकार भवन आणि जुना बोरामणी नाका ते पत्रकार भवन अशी शहरातील दोन प्रस्तावित उड्डाणपूल आहेत. त्यांच्यासाठी भूसंपादन प्रक्रियेत सरकारी इमारतींचा विषय आहे. राज्याच्या अखत्यारीतील कार्यालयांच्या इमारतींना शासनाची 'ना-हरकत' (एनअेसी) मिळाली. केंद्रीय कार्यालयांचा प्रस्ताव दिल्लीला पाठवल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली. दिल्लीहून ना-हरकत मिळण्यासाठी विलंब लागेल, असेही ते म्हणाले.

# संजय लोंढे यांची औसा काँग्रेस विधानसभा युवक अध्यक्षपदी निवड

## राज्याचे माजी मंत्री लातुरचे आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते निवडीचे पत्र



औसा प्रतिनिधी/अमर जाधव : गेल्या अनेक वर्षापासून निष्ठेने काँग्रेस पक्षाचे काम करणारे सुग्रिव भाऊ लोंढे यांचे सुपुत्र संजय लोंढे यांची औसा कॉंग्रेसच्या युवक विधानसभा अध्यक्षपदी निवड झाली असुन .संजय सुग्रीव लोंढे यांनी गेल्या दहा वर्षापासुन सक्रीय राजकारणात आपला सहभाग नोंदवत एक निष्ठेने काँग्रेस पक्षाशी राहुन पक्ष संघटन व पक्ष वाढीसाठी अतुलनीय कार्य केल्याने त्यांना औसा तालुका युवक अध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी मिळाली आहे,आगामी स्थानिक स्वराज संस्था निवडणुकीत खांदेपालट करण्यात आला असुन, आगामी जिल्हा परीषद पंचायत समिती निवडणुकीत काँग्रेस पक्षाला बळकटी मीळावी व औसा तालुक्यात पक्ष संघटण वाढीसाठी मदत व्हावी यासाठी निवडी करण्यात आल्या असुन संजय लोंढे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगीतले की येणार्या काळात पक्ष संघटण वाढीसाठी काँग्रेसचे विचार जनमानसात रुजवण्यासाठी मी प्रयत्नशिल असणार असुन पक्षाने मला दीलेल्या संधिच मी सोन करणार असल्याच यावेळी सांगीतले.

यावेळी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे मा. अध्यक्ष श्रीशैल्य उटगे, श्री संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन सचिन पाटील महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस अमर खानापुरे, औसा काँग्रेस तालुकाध्यक्ष किरण बाबळसुरे, अॅड. बाबासाहेब गायकवाड, अमरआबा भोसले, प्रकाश मिरगे, केशव भोसले, स्वयंप्रभा पाटील, वाघंबर कांबळे, बाळासाहेब सांगवे महादेव बिराजदार, यांच्यासह काँग्रेस मान्यवर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# 'कॅन्सरमुक्त महाराष्ट्रा'चा राज्य शासनाचा निर्धार : आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सार्वजनिक आरोग्य विभाग व टाटा कॅन्सर हॉस्पिटल यांच्या संयुक्त प्रयत्नांतून 'कॅन्सर मुक्त महाराष्ट्रा'चा संकल्प सिद्धिस नेऊया असे आवाहन आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी परळ येथील टाटा मेमोरियल हॉस्पिटलला भेट दिली. यावेळी त्यांनी विविध विभागाची पाहणी केली. आधुनिक कॅन्सर उपचार पद्धतीची माहिती घेतली. टाटा मेमोरियल सेंटरचे ऑल इंडिया डायरेक्टर डॉ. सुदीप गुप्ता, टाटा मेमोरियल हॉस्पिटल मुंबईचे डायरेक्टर डॉ. सी. एस.प्रमेश, डेप्युटी डायरेक्टर श्रीखंडे, डेप्युटी डायरेक्टर सिद्धनाथ लष्कर, रुग्णालय सुपरिटेन्डन्ट डॉ. विनीत सामंत यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, अलीकडच्या काळात कॅन्सर रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीनेही राज्यभर कॅन्सर तपासणी व उपचार मोहीम राबवली जात आहे. टाटा मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटलच्या माध्यमातून कॅन्सर निर्मूलनासाठीचे चांगले काम सुरु आहे.

राज्य शासनाने महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत पॅकेजच्या दरामध्ये वाढ केली असून, अनेक नवीन आजारांचा समावेश केला आहे. त्याचा कॅन्सर रुग्णांनाही फायदा होईल. महाराष्ट्रातील खासगी रुग्णालयांनी महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत कॅन्सर रुग्णांना उपचार पश्चात सेवा द्यावी. राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या माध्यमातून व टाटा कॅन्सर केअर हॉस्पिटलच्या तांत्रिक सहकार्याने राज्यात २६ ठिकाणी डे - केअर सेंटर सुरू करण्यात येणार आहेत. ग्रामीण भागातील जिल्हास्तरावर त्यामुळे कॅन्सर रुग्णांना सेवा उपलब्ध होईल. टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या भेटीत डे केअर तांत्रिक सहकार्य व प्रशिक्षण याबाबत चर्चा झाली. महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत समावेश असलेल्या रुग्णालयांनी सेवा अधिक प्रभावी करण्यासंदर्भात काही सूचना असल्यास आरोग्य विभागाच्या अभ्यास गटाला द्याव्यात असे आरोग्य मंत्री आबिटकर यांनी सांगितले.

# सिडकोच्या ४,५०० कोटींच्या घोटाळ्याची चौकशी होणार

(पान १ वरून..)

नाही. अखेर सेंट्रल एम्पॉवर्ड कमिटीच्या सूचनेनुसार राज्याच्या मुख्य २४ सचिवांनी नोव्हेंबरला बैठक घेतली आणि तात्काळ समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले.

आमदार रोहित पवार यांनी मात्र या समितीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केला आहे. सरकारने आज समिती स्थापन केली असली तरी समिती स्थापन करतानाही घोळ केलेला दिसतो. ज्या अधिकाऱ्याने (लक्ष्मीकांत जाधव) हा जीआर काढला आहे त्याच अधिकाऱ्याने जमीन देण्याची शिफारस करणारे पत्र सिडकोला लिहिले होते. आजच्या समितीत समितीचे सचिव म्हणून जे अधिकारी आहेत त्यांनीच बिवलकर यांना जमीन अलोट केली होती. हे सर्व बघता आजची समिती म्हणजे चोरालाच पोलीस केल्यासारखं आहे, असा आरोप रोहित पवारांनी केला. हे सर्व पाहता निवृत्त न्यायाधीशांच्या देखरेखीखाली स्वतंत्र चौकशी करणं गरजेचं आहे अशी मागणी रोहितप पवारांनी केली आहे.

# लोकमंगल कृषी व कृषी संलग्नित महाविद्यालयात संविधान दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, वडाळा येथे आज संविधान दिन आणि २६/११ शहीद स्मृतिदिनानिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन फुगे व प्रमुख पाहुणे म्हणून लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सागर महाजन उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात संविधान निर्मात्यांना अभिवादन करून झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आणि उपस्थितांनी संविधान प्रस्तावनेचे सामूहिक वाचन केले. तसेच संविधानाच्या निर्मितीची गरज समजून सांगणारी डॉक्युमेंटरी विद्यार्थ्यांना दाखवून संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांची जाणीव लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर सचिन फुगे सर यांनी आपल्या वक्तव्यातून दृढ केली. यानंतर २६ नोव्हेंबर २००८ या दिवशी मुंबई दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या पोलिस,



छडऋकमांडो आणि नागरिकांच्या स्मरणार्थ सर्वांनी एक मिनिट मौन पाळून आदरांजली अर्पण केली. मुख्य पाहुण्यांनी तरुण पिढीला संविधानिक मूल्यांचे पालन करावे आणि शहीदांच्या शौर्यापासून प्रेरणा घ्यावी असे आवाहन केले. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रभक्तीने भारलेल्या 'जय हिंद' घोषणांनी करण्यात आला. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी समीक्षा तोडकरी हिने केले. सदरील कार्यक्रमास सर्व विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोलापूर उड्डाणपुलाच्या पाडकामामुळे १४ डिसेंबर रोजी 'मेगाब्लॉक'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर रेल्वे स्थानक परिसरातील जुन्या उड्डाणपुलाचे (ठजइ) पाडकाम हाती घेण्यात येणार असल्याने मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात १४ डिसेंबर २०२५, रविवार रोजी तब्बल साडेबारा तासांचा (१२:३० तास) मेगाब्लॉक घोषित करण्यात आला आहे.

या कामामुळे सोलापूर विभागातून धावणाऱ्या ११ गाड्या पूर्णपणे रद्द करण्यात आल्या असून, ८ गाड्या वळवण्यात आल्या आहेत. प्रवाशांनी याची नोंद घेऊन सहकार्य करावे, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

गाड्या रद्द, शताब्दी एक्सप्रेसचा समावेश

१४ डिसेंबर (रविवार) रोजी मध्य रेल्वे सोलापूर यार्डातून धावणाऱ्या ११ गाड्या पूर्णपणे रद्द करण्यात आल्या आहेत. यामध्ये महत्त्वाची पुणे-सिकंदराबाद शताब्दी एक्सप्रेस (१२०२५) देखील रद्द राहील.

। महत्त्वाच्या रद्द गाड्या (१४ डिसेंबर) ।

।---।

। १२०२५ PUNE-SC SHTBDI &

। ११४१६/११४१५ HPT-SUR Express (दोन्ही दिशांना) ।

। ११४१८ SUR-PUNE Express ।

या गाड्या वळवल्या, काही KWV/KLBG पर्यंतच

मेगाब्लॉकमुळे वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी ८ गाड्यांच्या मार्गात बदल करण्यात आला आहे. तसेच, काही पॅसेंजर गाड्या त्यांच्या नियोजित स्थानकापूर्वीच थांबवण्यात येणार आहेत (शॉर्ट टर्मिनेशन).

■ वळवलेल्या गाड्या: म्हैसूर-पंढरपूर एक्सप्रेस (१६५३५/१६५३६), टीव्हीसी-सीएसएमटी एक्सप्रेस (१६३३२), एसबीसी-सीएसएमटी एक्सप्रेस (११३०२/११३०१) या गाड्या सोलापूरकडे न जाता वळवण्यात आलेल्या मार्गाने धावतील.

■ प्रवासाची समाप्ती/सुरुवात: पुणे-सोलापूर एक्सप्रेस (१२१६९) कुर्डुवाडी (KWV) पर्यंतच धावेल, तर सोलापूर-हासन एक्सप्रेस (११३११) कलबुरगी (KLBG) येथून सुरू होईल.

कामाचे स्वरूप

हा ब्लॉक सोलापूर येथील रेल्वे ओव्हर ब्रीज (ठजइ) चे सुपर स्ट्रक्चर आणि सब स्ट्रक्चर तोडण्यासाठी घेण्यात आला आहे. कामाची सुरुवात १० डिसेंबरपासून तयारीच्या टप्प्याने होईल. १४ डिसेंबर रोजी मुख्य १२:३० तासांच्या ब्लॉकमध्ये क्रेनच्या साहाय्याने पुलाचे गर्डर उचलून हटवले जातील. या कामाची देखरेख DEN/T/SUR, SSE (P-Way) आणि SSE (Spl. Works) यांच्या संयुक्त विद्यमाने केली जाणार आहे.

प्रवाशांना आवाहन

रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना विनंती केली आहे की, त्यांनी १४ डिसेंबर रोजी प्रवास करण्यापूर्वी त्यांच्या गाडीची स्थिती निश्चितपणे तपासून घ्यावी. तसेच, ब्लॉक संपल्यानंतर ट्रॅक सुरक्षित असल्याची खात्री झाल्यावर पहिली गाडी फक्त १० घचझक च्या वेगाने चालवली जाईल. प्रवाशांनी रेल्वे प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.


हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राईजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## माधुरी दिलीप धोत्रे यांना प्रभाग १७ मधून प्रचारात मोठी आघाडी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर नगरपालिका निवडणूक २०२५ नगरपालिका निवडणुकीमध्ये प्रभाग क्रमांक १७ अ आणि सतरा ब यामध्ये उमेदवार लंकेश नागेश यादव आणि सौ माधुरी दिलीप धोत्रे हे तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे उमेदवार असून प्रभाग क्रमांक १७ मध्ये प्रचारा अगड घेतलेले चित्र स्पष्ट दिसत आहे. प्रभागामध्ये सर्व जाती-धर्माचे लोक असून त्यांचा सर्वांचा पाठिंबा असल्याचे सध्या स्थितीतून दिसून येत आहे.

वार्डामध्ये मतदान करणारे मोठे वयस्कर लोक श्री माधुरी दिलीप धोत्रे यांना आपली भेटी मानून त्यांना आचार मोठ्या प्रमाणावर करत आहे.

वार्डामध्ये मोठ्या प्रमाणात चौका चौकामध्ये त्यांचे स्वागत व त्यांना उत्स्फूर्तपणे भतीसात या वार्डामध्ये देत आहेत.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते दिलीप बाबू धोत्रे यांनी वार्डातील लोकांना घरी लोकांना कोरोनामध्ये मोठ्या प्रमाणाचे मदत केली असून त्या प्रत्येक व्यक्ती दिलीप बापू धोत्रे यांच्या पत्नी श्रीमती माधुरी दिलीप धोत्रे ती तसेच आघाडीचे मध्यम मोठ्या प्रमाणावर वयस्कर व प्रत्येक जाती धर्माचे लोक त्यांना प्रचारामध्ये मोठ्या प्रमाणात त्यांनी आघाडी घेतल्याचे वार्डातून सर्वसामान्य लोकांमधून बोलले जात आहे व त्यांचे कार्य अतिशय चांगले असल्यामुळे दिलीप बापू धोत्रे यांना वार्डामध्ये मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसत आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी जोमाने कामाला लागा : उपमुख्यमंत्री अजित पवार

## सोलापूर राष्ट्रवादी पदाधिकाऱ्यांकडून वडाळ्यात अजितदादांचे स्वागत!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, प्रतिनिधी : आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी जोमाने कामाला लागा, असे आदेश राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी दिले आहेत.



उपमुख्यमंत्री अजितदादा पवार गुरुवारी उत्तर सोलापूर तालुक्यातील वडाळा दौऱ्यावर होते. सकाळी त्यांचे लोकमंगल कृषी महाविद्यालयाच्या हेलीपॅडवर हेलिकॉप्टरने आगमन झाल्यानंतर सोलापूर शहर - जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, जेष्ठ नेते सुधीर खरटमल, प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव,आनंद चंदनशिवे, राष्ट्रवादीचे नेते तौफीक शेख आदींनी त्यांचे स्वागत केले. आगामी सोलापूर महानगरपालिका निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर गुरुवारपासून विधानसभेचे उपाध्यक्ष तथा सोलापूरचे सहसंपर्क मंत्री अण्णा बनसोडे हे तीन दिवस सोलापूरच्या दौऱ्यावर असून शहरातील सर्व २६ प्रभागात त्यांच्या भेटीगाठी, पदाधिकारी व कार्यकर्ता बैठक, विविध पक्षातील नेत्यांचे पक्षप्रवेश आदी कार्यक्रम आयोजित करण्यात आले असल्याचे यावेळी पदाधिकाऱ्यांनी अजितदादांना सांगितले.सर्वजन एकोप्याने, मिळून, सर्वांना सोबत घेऊन व संघटित होऊन राष्ट्रवादीचे जोमाने काम करा,असे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी यावेळी सांगितले असल्याचे,जिल्हाध्यक्ष संतोय पवार यांनी सांगितले.

यावेळी माजी उपमहापौर विष्णू निकंबे, माजी नगरसेवक गणेश पुजारी, चेतन गायकवाड, प्रदेश सरचिटणीस इरफान शेख आदी उपस्थित होते.

# परिचारकांच्या विकासाभिमुख नेतृत्व पंढरपूरच्या नागरिकांचा विश्वासास पात्र

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर नगरपालिका २०२५ च्या निवडणुकीच्या भाजपचे नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्यामल शिरसाट यांच्यासाठीमा. आ. प्रशांत परिचारक,आ. समाधान आवताडे मैदानात उतरले आहे.

पंढरपूर नगरपालिकेचे पंचवार्षिक निवडणूक सुरू असून यामध्ये भारतीय जनता पार्टीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्यामल शिरसाठ आणि तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या नगराचे पदाच्या उमेदवार डॉक्टर प्रणिती भालके यांच्या थेट लढत होत आहे.

पांडुरंग परिवाराच्यावतीने भाजप उमेदवार शामल शिरसाट यांच्या विजयासाठी माजी आमदार प्रशांत परिचारक, आमदार समाधान आवताडे, युवक नेते प्रणव परिचारक, हे निवडणूक मैदानात उतरलेले असून त्यांच्या प्रचारास पंढरपूर नगरीत मोठा प्रतिसाद मिळत आहे.

२०१६ मध्ये झालेल्या नगरपालिका निवडणूक भाजप आणि इतर विकास आघाडीने शहरातील नागरिकांना दिलेल्या वचननाम्यात पूर्ण केल्याचा दावा माजी आमदार पछंदराव परिचारक यांनी केला आहे.





मागील अनेक वर्षापासून पंढरपूर शहरात भाजप सरकारच्या माध्यमातून दिलेल्या केलेल्या विकास कामावर आणि पुढील विकासाची व्हिजन पंढरपूर नगरपालिकेसमोर मांडले जात आहे मात्र विरोधकाकडून विकासात न बोलता परिचारक आठव अशी दोषाची भावना जपली जात असल्याच्या टोला भालके यांनी माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांना लगावला.

भाजपच्या निवडणूक प्रचार फेरी मिळणाऱ्या प्रतिसादावरून माजी आमदार प्रशांतराव प्रचारक यांच्या विकासानंद प्रमुख नेतृत्व नागरिकांच्या विश्वासात पात्र कायम असल्याचा दावा त्यांच्या समर्थकांकडून केला जात आहे पंढरपूर नगरपालिकेवर मागील पांडुरंग परिवार चे वर्चस्व आहे.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांच्या माध्यमातून माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांनी पंढरपूरच्या विकासासाठी मोठा निधी खेचून आणला आहे. त्यांनी करून विकासाला चालना दिलेली आहे. त्यामुळे त्यांच्यावर नागरिकांचा विश्वास कायम आहे.

नगरपालिकेत अनेक वर्षापासून प्रतिनिधित्व करत असणारे माजी नगराध्यक्ष लक्ष्मण शिरसाठ माजी भाजप शहराध्यक्ष नगरसेवक विक्रम शिरसाठ यांनी केलेल्या कामाच्या जोरावर परिचारक यांनी या निवडणुकीत कामाचे साठे यांच्या माध्यमातून सर्वसामान्यांसाठी काम करणाऱ्या सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्तीला नगडात हे पदाची उमेदवारी दिल्याने सर्वसामान्य जनता त्यांच्या पाठीशी उभी राहील आणि याचा फायदा नक्कीच पक्षाला होईल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## मौजे पांगारे येथील निष्णाई मंदिरातून तीन लाखांचा ऐवज लंपास

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ विनायक गायकवाड : पुरंदर ::पांगारे (ता. पुरंदर) येथील ग्रामदैवत श्री निष्णाई मंदिरात चांदीच्या वस्तू तसेच दानपेटीची चोरी झाली असल्याचे पोलीस पाटील तानाजी काकडे यांनी सांगितले. सासवड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला आहे. उपविभागीय पोलिस अधिकारी राजेंद्रसिंह गौर, पोलीस निरीक्षक कुमार कदम, हवालदार रुपेश भगत, पोलीस कॉन्स्टेबल अक्षय चिल्ले यांनी मंदिराची पाहणी केली आहे. पहाटे साडेपाच वाजता देवीचे पुजारी राजेंद्र गुरव हे पूजा करण्यासाठी आले असता मंदिरातील दिवे बंद होते. मंदिरातील दिवे सुरू केले असता सुरुवातीला दानपेटीत नसल्याचे लक्षात आले.

## जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा मोहा येथे संविधान दिन उत्साहात साजरा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब : प्रतिनीधी सुधाकर रणदिवे,मोहा येथील जिल्हा परिषद केंद्रीय शाळेत २६ नोव्हेंबर संविधान स्वीकृत दिनाचे औचित्य साधुन गावामधुन रली काढण्यात आली त्यामध्ये डा बाबासाहेब आंबेडकर यांचा विजय असो, संविधान दिनाचा विजय असो, अशा घोषणा देण्यात आल्या यामध्ये सर्व विद्यार्थी, शिक्षक, तसेच कर्मचारी वृंद सहभागी झाले होते, शिक्षिका आणि शिक्षिक यांनी आपल्या भाषणातुन संविधानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले यावेळी आल इंडिया पथर सेनेचे जिल्हाअध्यक्ष अशोक कसबे व ज्ञानेश्वर मडके यांनी उपस्थित सर्व मुलांना खाऊ वाटप केला.यावेळी सामाजिक करायकर्ते बाबासाहेब कसबे, कोंडीबा कसबे, विशाल कसबे उपस्थित होते.

# म.वि.प्र सांस्कृतिक व कर्मवीर कबड्डी चषक स्पर्धेत जनता विद्यालय नांदूर्डीचे यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नांदुर्डी : जनता विद्यालय नांदूर्डी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी म. वि. प्र. सांस्कृतिक महोत्सव कसबे सुकेने येथे झालेल्या स्पर्धांमध्ये यश मिळून जिल्ह्यासाठी पात्र झाले आहेत यामध्ये समूह नृत्य प्रथम क्रमांक समूह गीत द्वितीय क्रमांक व नाटिका द्वितीय क्रमांक त्याचबरोबर मग कर्मवीर कबड्डी चषक स्पर्धांमध्ये मूले व मुली यांनी बाजी मारून दोन्ही संघ जिल्ह्या पातळीवर निवड झाली असून पुढील होणाऱ्या



स्पर्धेसाठी विद्यालयातील मा.मुख्याध्यापक श्री म्हसकर बी डी पर्यवेक्षिका श्रीमती रनशूर मॅडम स्कूल कमिटी अध्यक्ष रामदास तात्या बोराडे, श्री एकनाथ पा. निकम, सिताराम पा.ढोमसे, ज्येष्ठ शिक्षक श्री शिंदे टी जी, पगारे आर व्ही,आहेर एस आर,पवार व्ही के,पगारे आर व्ही, म. वि. प्र. सोसायटी संचालक जाधव डी जी,शेंडे यू बी, निकम एस डी व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून देऊन पुढील जिल्हा पातळीवर होणाऱ्या स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या या स्पर्धेत मार्गदर्शन करणारे सांस्कृतिक महोत्सव मार्गदर्शक श्रीमती कुंदे एन डी, गावित जी सी, शिंदे डी पी, कर्मवीर क्रीडा चषक स्पर्धा मार्गदर्शक श्री काळे एम पी, श्रीमती मोरे ए एस यांचे विद्यालय व स्कूल कमिटीच्या वतीने सत्कार करण्यात आला व जिल्हा पातळीवर होणाऱ्या स्पर्धे साठी शुभेच्छा देण्यात आल्या या स्पर्धेसाठी विद्यालयातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

### तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग येथे प्रचार सभा; नागरिकांची अफाट गर्दी

# जनतेची सेवा करण्याची इच्छाशक्ती असलेले आपल्या हक्काचे वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांना विजयी करा : सुजात आंबेडकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : आतापर्यंत आपण निवडून दिलेले आमदार,खासदार नगरसेवक,अध्यक्ष यांना जनतेची विकास कामे करण्याची इच्छाशक्तीच नसल्यामुळे धरण उशाला असून देखील पंधरा दिवसातून एकदा पाणी मिळण्याची वेळ आपल्यावर आली त्यांनी जनतेची कामे करण्यापेक्षा स्वतःचा स्वार्थ साधून केवळ भावनिक करून जाती-जातीमध्ये हिंदू मुस्लिमा मध्ये तेढ निर्माण करून आपली राजकीय पोळी भाजून घेतली याचा विचार करून जनतेची सेवा करण्याची इच्छाशक्ती असलेल्या वंचित बहुजन आघाडीच्याच उमेदवाराला विजय करा असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांनी नळदुर्ग




येथे बोलताना केले.

तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये प्रभाग क्रमांक दोन मधून सखाराम नारायण गायकवाड प्रभाग क्रमांक आठ मधून ओंकार कलशेट्टी तर प्रभाग दहा मधून सचिन राठोड हे नगरसेवक पदाची निवडणूक लढवत असून दिनांक २६ नोव्हेंबर संविधान दिनाचे अवचित साधून त्यांच्या प्रचारार्थ नळदुर्ग येथील भीम नगर मध्ये सुजात आंबेडकर यांच्या सभेचे आयोजन वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आले होते.याप्रसंगी ते सभेला मार्गदर्शन करताना बोलत होते पुढे बोलताना ते म्हणाले की नळदुर्ग हे शहर ऐतिहासिक किल्ल्यामुळे पर्यटन स्थळाचा दर्जा लाभलेले शहर आहे या ठिकाणी अनेक विकास कामे, अनेक शासनाच्या योजन राबविण्याची संधी असून पर्यटनाच्या दृष्टीने व्यापक विकास केला तर येथील बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो,येथील जनतेला दररोज पाणी मिळण्याची व्यवस्था ही होऊ शकते परंतु येथील प्रतिनिधीला काम करण्याची इच्छाशक्ती असावी लागते त्यासाठी आपले हक्काचे प्रतिनिधी निवडून देणे गरजेचे आहे.

या सभेचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन वंचित बहुजन आघाडीचे तुळजापूर तालुका अध्यक्ष गोविंद भंडारी यांनी केले यावेळी वंचित बहुजन आघाडीचे केंद्रिय कार्यकारणी सदस्य डॉ.नितीन ढेपे, मराठवाडा विभाग उपाध्यक्ष प्रवीण दादा रणबागुल,धाराशिव जिल्हा अध्यक्ष अँड.प्रवीण डिकले जिल्हा उपाध्यक्ष आर.एस.गायकवाड जिल्हा संघटक विकास बनसोडे, परमेश्वर लोखंडे उमरगा तालुका अध्यक्ष रामभाऊ गायकवाड नळदुर्ग शहराध्यक्ष श्यामसुंदर भैया लोखंडे सह कार्यकर्ते,नागरीक, महिला युवा कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

## मानव अधिकार आंदोलन संघटनेच्या वतीने उपविभागीय अधिकारी गणेश शिंदे यांचा सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनीधी/सुधाकर रणदिवे : कळंब येथे दि.२७ नोव्हेंबर २०२५ रोजी मानव अधिकार आंदोलन संघटनेच्या वतीने संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा. हनुमंत भाऊ पाटुळे यांच्या हस्ते कळंब येथील नुतन आलेले उपविभागीय अधिकारी श्री.गणेश शिंदे यांचा सत्कार पुष्प गुच्छ देऊन करण्यात आला.

या सत्कार प्रसंगी पत्रकार अनिल गाडे, सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब टोपे, सुनील ताटे, सतीश टोपे, नटराज गायकवाड, यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# पारदर्शक व निर्भय मतदान प्रक्रिया राबवण्यासाठी सज्ज रहा : निवडणूक निर्णय अधिकारी सीमा होळकर

## पंढरपूर येथे द्वितीय निवडणूक प्रशिक्षण उत्साहात; ५७१ अधिकारी-कर्मचाऱ्यांची उपस्थिती






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ अनुषंगाने गुरुवारी दि.२७ नोव्हें. रोजी नामसंकीर्तन सभागृह, पंढरपूर येथे दुसरे सविस्तर प्रशिक्षण यशस्वीरित्या पार पडले. निवडणूक निर्णय अधिकारी सीमा होळकर,सहा. निवडणूक निर्णय अधिकारी महेश रोकडे यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना निवडणूक प्रक्रियेबाबत सखोल मार्गदर्शन केले. प्रशिक्षणावेळी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सर्व कर्मचाऱ्यांना ही राष्ट्रीय जबाबदारी निष्पक्षपणे आणि पारदर्शकपणे पार पाडण्याच्या सूचना दिल्या.

द्वितीय प्रशिक्षणासाठी केंद्राध्यक्ष ११०, मतदान अधिकारी ३३०, मतदान कर्मचारी ८६ व नप कर्मचारी ४५ अशा एकूण ५७१ अधिकारी- कर्मचाऱ्यांची उपस्थिती नोंदवण्यात आली. प्रशिक्षणात निवडणूक प्रक्रिया व कायदेशीर तरतुदी, मतदानाच्या दिवशी पार पाडावयाच्या सर्व कायदेशीर बाबी, मतदानाची गोपनीयता आणि करावयाची कार्यवाही यावर पीपीटी आणि व्हिडिओद्वारे दाखवून माहिती दिली. तसेच, ईव्हीएम सीलिंग व हाताळणी, मतदान यंत्रे सील करण्याची तांत्रिक पद्धत व त्यावेळी घेण्याच्या दक्षतेवर मार्गदर्शन केले.

हँड्स-ऑन ट्रेनिंग अर्थात प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी कोणतीही अडचण येऊ नये यासाठी एलसीडी प्रोजेक्टरच्या माध्यमातून व्हिडिओज दाखवून आणि ईव्हीएम मशीन हाताळणीचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले. निवडणूक प्रक्रिया अत्यंत अचूकपणे पार पाडण्यासाठी कर्मचाऱ्यांना टप्प्याटप्प्याने प्रशिक्षित केले जात असल्याचे सहा. निवडणूक निर्णय अधिकारी महेश रोकडे यांनी सांगितले.

# सुजात दादा आंबेडकर यांची धाराशिव शहरात कडाडली तोफ ..




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव: प्रतिनिधि, सुधाकर रणदिवे, वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सन्माननीय सुजात दादा आंबेडकर यांची विरोधकांवर कडाडली तोफ दि २६ रोजी क्रांती चौक,भीमनगर धाराशिव येथे वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी आले होते.

वंचित बहुजन आघाडीच्या सर्व नगराध्यक्ष आणि नगरसेवक उमेदवारां साठी धाराशिव येते प्रचार सभा संपन्न झाली. या सभेला भरभरून प्रतिसाद मिळाला

सभेच्या शेवटी भिम प्रतिष्टान या ग्रुप च्या कार्यकर्त्यांनी वंचित बहुजन आघाडी मध्ये पक्ष प्रवेश केला. या सभेला धाराशिव शहरामधून तरून वर्ग व महिला, पुरूष मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



# बाबा ग्रुप फाऊंडेशनच्या वतीने लोनाड येथे आरोग्य शिबिर संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत बाबा ग्रुप फाऊंडेशनच्या वतीने भिवंडी तालुक्यातील लोनाड येथे आरोग्य तपासणी शिबिर व नेत्र तपासणी शिबिर घेऊन बाबा ग्रुप फाऊंडेशनने सामाजिक बांधिलकी जपली आहे.

यावेळी एपेक्स हॉस्पिटल्स मुलुंड आणि आय हॉस्पिटल यांचे शिबिरासाठी सहकार्य लाभले असून,

आरोग्य शिबिरात एक्स-रे, चष्मे, मेडिसिन, बाबा ग्रुप फाउंडेशनच्या तर्फे मोफत देण्यात आले असून अनेक नागरिकांनी आरोग्य शिबिराचा लाभ घेतला. कार्यक्रम यशस्वी कण्यासाठी बाबा ग्रुप फाऊंडेशन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अनिकेत जाधव,खजिनदार हरेश जाधव, सदस्य विकास धनगर, अजय जाधव, ड्रायव्हर संघटना अध्यक्ष जावेद आली,प्रवेश खलिफा,ऋतिक जाधव, प्रकाश गायकवाड, विशाल तांबे, आदित्य जाधव, रोहित जाधव यांनी मेहनत घेतली.

# नंगपुरामुर्री निवासी शाळेत संविधान दिनानिमित्त जनजागृती स्पर्धा उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोंदिया : तालुक्यातील नंगपुरामुर्री येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा याठिकाणी संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांच्या अध्यक्षतेखाली शाळेतील शिक्षक नीता भलमे, मुन्नाभाई नंदागवळी, प्रदीप ढवळे, साधना पारधी, आशिष शहारे, कार्तिक शहारे, दीक्षा तुरकर तुषार महाजन आदी प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधान यांना अभिवादन करून दीपप्रज्वलन करण्यात आले होते. यावेळी शाळेमध्ये राज्यस्तरीय संविधान गुणगौरव परीक्षा आयोजित करण्यात आली.

### विद्यार्थ्यांचा उत्सफूर्त सहभाग : विविध स्पर्धा आयोजित

तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधान याविषयी जनजागृती करण्यासाठी संविधान सन्मान रॅली, निबंध स्पर्धा, चित्रकला, रांगोळी स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. संविधान मंच स्थापन करून भारतीय उद्देशिका सामुहिक वाचन करून संचालन व आभार मुन्नाभाई नंदागवळी यांनी मानले.

# मतदान व मतमोजणी कालावधीत (मद्य विक्री दुकाने) अनुज्ञप्ती बंद आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या उपरोक्त आदेशान्वये राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतीच्या (एकूण २८८) सदस्य पदासाठी आणि थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहिर केलेला आहे. सदरील निवडणूकीच्या जाहिर झालेल्या कार्यक्रमानुसार, सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट, अकलुज, बार्शी, दुधनी, मैंदर्गी, करमाळा, कुडुवाडी, मंगळवेढा, मोहोळ, पंढरपूर, सांगोला नगरपरिषद व ०१ अनगर नगरपंचायत सदस्यपदांच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी दि. ०२ डिसेंबर, २०२५ रोजी मतदान व दि. ०३ डिसेंबर, २०२५ रोजी मतमोजणी होणार आहे.

सदर निवडणूक खुल्या, मुक्त व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी तसेच संबंधित नगरपरिषदा / नगरपंचायत निर्वाचन क्षेत्रामध्ये सार्वजनिक शांतता व कायदा व सुव्यवस्था अवाधीत राहण्यासाठी जिल्हाधिकारी, कुमार आशिर्वाद (भा.प्र.से.) यांनी, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम १४२ (१) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सोलापूर जिल्ह्यात निवडणूक असलेल्या संबंधित नगरपरिषदा / नगरपंचायत निर्वाचन क्षेत्रातील सर्व देशी / विदेशी किरकोळ मद्य विक्री व ताडी विक्री अनुज्ञप्ती (नमुना एफएल-२. एफएल-३, एफएल-४ (क्लब अनुज्ञप्ती), एफएल/बीआर-२, सीएल-२, सीएल-३., सीएल/ एफएल/टिओडी-३, टिडी-१ इ.) इत्यादी) खालील प्रमाणे बंद ठेवण्याचे आदेश देत आहे.

कोरडे दिवस बंद कार्यक्षेत्र बंदचा कालावधी - दि.१ डिसेंबर २०२५ (मतदानाचा आदला दिवस) -अनुज्ञप्ती बंद ठेवण्याचे क्षेत्र- सोलापूर जिल्हयातील नगरपरिषद क्षेत्र अक्कलकोट, अकलुज, बार्शी, दुधनी, मेंदी, करमाळा, कुर्दुवाडी, मंगळवेढा, मोहोळ, पंढरपूर, सांगोला नगरपरिषद व ०१ अनगर नगरपंचायत. - बंदचा कालावधी - संपूर्ण दिवस

कोरडे दिवस बंद कार्यक्षेत्र बंदचा कालावधी - दिनांक ०२ डिसेंबर २०२५ . (मतदानाचा दिवस) संबंधीत निर्वाचन क्षेत्र- अनुज्ञप्ती बंद ठेवण्याचे क्षेत्र- सोलापूर जिल्हयातील नगरपरिषद क्षेत्र अक्कलकोट, अकलुज, बार्शी, दुधनी, मैंदर्गी, करमाळा, कुडुवाडी, मंगळवेढा, मोहोळ, पंढरपूर, सांगोला नगरपरिषद व ०१ अनगर नगरपंचायत - बंदचा कालावधी - संपूर्ण दिवस

कोरडे दिवस बंद कार्यक्षेत्र बंदचा कालावधी - दिनांक ०३ डिसेंबर २०२५ (मतमोजणीचा दिवस) संबंधीत निर्वाचन - अनुज्ञप्ती बंद ठेवण्याचे क्षेत्र- सोलापूर जिल्हयातील नगरपरिषद क्षेत्र अक्कलकोट, अकलुज, बार्शी, दुधनी, मैंदर्गी, करमाळा, कुडुवाडी, मंगळवेढा, मोहोळ, पंढरपूर, सांगोला नगरपरिषद व ०१ अनगर नगरपंचायत- बंदचा कालावधी- संपूर्ण दिवस

ज्या निर्वाचन क्षेत्रातील निवडणूक बिनविरोध होईल तेथे उपरोक्त आदेश लागू राहणार नाहीत. सदर आदेशाची अंमलबजावणी काटेकोरपणे करावयाची असून त्यात कसूर झाल्यास संबंधित अनुज्ञप्तीधारकां विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम ५४ व ५६ मधील तरतुदीनुसार अनुज्ञप्ती कायम स्वरुपी रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

असे आदेश जिल्हाधिकारी, कुमार आशीर्वाद यांनी दिले आहेत.

# व्हीआयपी नंबरसाठी सोलापूर आरटीओला मिळाले १९ लाख

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : दुचाकींच्या नव्या सीरीजमधील व्हीआयपी नंबरच्या लिलावातून सोलापूर प्रादेशिक परिवहन कार्यालयास १८ लाख ८४ हजार रुपयांचा महसूल मिळाला. यातील आठ नंबरसाठी दोनपेक्षा अधिक जणांनी अर्ज केले होते.सोलापूर प्रादेशिक परिवहन विभागाची दुचाकीसाठी इ.झेड् ही नवी सीरिज सुरु झाली आहे. या सीरिजमधील व्हीआयपी नंबरसाठी अर्ज मागवले होते. या सीरिज मधील २२९ नंबरमधून आरटीओला तब्बल १८ लाख ८४ हजार रुपयांचा महसूल मिळाला आहे. यातील आठ नंबरसाठी दोनपेक्षा अधिक अर्ज आले होते. १७१७ नंबरसाठी सर्वात जास्त सात अर्ज आले होते. ज्याची रक्कम अधिक होती त्यांना हा नंबर देण्यात आला.

४१४१ तसेच २७०० या दोन नंबरसाठी प्रत्येकी तीन अर्ज आले होते, यामधून सर्वात जास्त बोली लावलेल्या नागरिकास हे नंबर देण्यात आले. दुचाकीसाठी व्हिआयपी नंबर घेण्यासाठी सोलापूरकर पैसे खर्च करीत असल्याचे दिसते. याआधी देखील दुचाकीच्या नव्या सीरिजमधील व्हीआयपी नंबर मधून आरटीओला लाखो रुपयांचा महसूल मिळाला आहे.

नव्या सीरिजमधून दुचाकींचे २२९ व्हीआयपी नंबर गेले आहेत. ज्यांनी नंबर घेतले आहेत त्यांनी सीरिज संपायच्या आतमध्ये नवीन गाडी घेऊन तो नंबर घेणे बंधनकारक आहे. दुचाकीच्या सीरिजमधील न गेलेला नंबर चारचाकी गाडीसाठी पाहिजे असेल, तर त्यासाठी जादा पैसे मोजावे लागतात. दरवेळी असे अनेक नंबर घेतले जातात. त्यातून पुन्हा आरटीओला जादा महसूल मिळतो. या सीरिज मधूनही पुढे जास्त महसूल मिळण्याची आशा आहे.

# गौर येथे उत्साहात संविधान दिन साजरा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब: प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यातील गौर येथे संविधान दिन साजरा करण्यात आला. या निमीत्ताने गावातून जि.प.शाळेतील विद्यार्थ्यांची रॅली काढून जनजागृति करण्यात आली. त्यावेळी गावातील प्रतिष्ठित मंडळी यांचा संविधान प्रत देऊन सत्कार करण्यात आला. पंचायत समितीचे विस्तार अधिकारी साळुंखे साहेब यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.या वेळी समाजातील सर्व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

**पोलीस संकुल येथे संविधान दिन साजरा** | **रक्तदान शिबीरात ३३३ रक्तपिशव्या संकलीत**

# २६/११ च्या हल्ल्यातील शहीदांना पंढरपूरात आदरांजली; रक्तदान शिबीराचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : मुंबईवरील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याचा मुकाबला करताना शहीद झालेल्या मुंबई पोलीस दलातील अधिकारी कर्मचारी तसेच सुरक्षा दलातील वीरांच्या व नागरिकांच्या सन्मानार्थ तसेच पंढरपूरचे वीर सुपुत्र शहीद मेजर कुणालगिरी गोसावी यांच्या स्मृतिदिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रक्तदान शिबिरात ३३३ रक्त पिशव्या संकलित झाल्या असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांनी दिली.

तसेच रुक्मिणी सभागृह, पोलीस संकुल येथे संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले तसेच संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन देखील करण्यात आले. त्याचबरोबर मुंबईवरील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याचा मुकाबला करताना शहीद झालेल्या मुंबई पोलीस दलातील अधिकारी कर्मचारी तसेच सुरक्षा दलातील वीरांना आदरांजली वाहण्यात आली.

रुक्मिणी सभागृह, पोलीस संकुल येथे पंढरपूर उपविभागातील पोलीस प्रशासन व पंढरपूर ब्लड बैंक व बजाज ब्लड बैंक पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यामाने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, पोलिस निरिक्षक विश्वजीत घोडके, . टि.वाय. मुजावर, रेखा घनवट , सहा.पो.नि सांगर कुंजिर, पोसई हमीद शेख तसेच , पंढरपूर ब्लड बँकेचे डॉ. प्रसाद खाडिलकर, बजाज ब्लड बँकेचे डॉ. मंदार सोनवणे उपस्थित होते.

यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांनी मुंबईवरील २६/११ (२००८) दहशतवादी हल्ल्यावेळी शहराचं रक्षण, नागरिकांचा जीव वाचवताना मुंबई पोलिस, एनएसजी, गृहरक्षक, अग्निशमन, सर्वच सुरक्षा दलांच्या अधिकारी, जवानांच्या असामान्य धैर्य, शौर्य, पराक्रमाबाबत माहिती दिली. तसेच विदयार्थ्यांनी स्पर्धा परिक्षा देवून प्रशासकीय सेवेत येण्याकरीता चांगल्या प्रकारे अभ्यास करावा याकरीता मार्गदर्शन केले. यावेळी तसेच रक्तदानाचे महत्व विशद करुन यावर्षी रक्तदान शिबीराचे हे ०९ वे वर्षे असून आतापर्यंत सुमारे ४००० रक्त बॅगा संकलन करून यापुढेही या सामाजिक कार्यासाठी जास्तीत जास्त लोकांनी सहभाग नोंदवून रक्तदान करण्याचे आवाहन केले आहे.





यावेळी उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी वैदयकीय क्षेत्रात रूग्णांना होणारा रक्ताचा अपुरा पुरवठा व त्याकरीता पोलीस दलातर्फे आयोजित केलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले. अशा प्रकारे प्रत्येक युवकव युवतीने सामाजिक कार्यात व देशसेवेकरीता तत्पर तयार राहीले पाहीजे अशा प्रकारचा आशावाद व्यक्त केला.

यावेळी रक्तदान शिबीरात पंढरपूर व परिसरातील सर्व स्तरातील लोकांनी स्वयंस्फुर्तीने मोठया प्रमाणात रक्तदान केले यामध्ये विविध कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.